रे.मु.नं.१६/२०१७

कारभारी वि. प्रकाश

## आदेश नि.क्र.२५

सदर अर्ज प्रतिवादी क्र.९ तर्फे विनाकैफियतचा आदेश रद्द करून ती स्वीकारण्यासाठी आहे.

२. अर्ज, म्हणणे, शपथपत्र, दावा व कागदपत्रांचे अवलोकन केले.

३. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, तो आजारी असल्यामुळे तारखेस हजर राहू शकला नाही त्यामुळे विनाकैफियतचा आदेश झालेला आहे. त्यास बाजू मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे, शेवटी अर्ज मंजूर करण्यास विंनती केली आहे.

५. समोरील बाजूचे थोडकयात म्हणणे असे की, अर्जातील कारणे खोटी आहेत. अर्जातील कारणास कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल नाही, शेवटी अंजू नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. वादीतर्फे युक्तिवाद करण्यात आला की, अनेक प्रतिवादीविरोधात विनाकैफियतचा आदेश झालेला आहे व एकाच प्रतिवादीने सदर अर्ज दाखल केला आहे. वादी जेष्ठ नागरिक आहे. दिलेले कारण खोटे आहे. प्रतिवादीतर्फे युक्तिवाद करण्यात आला की नमूद कारणे खरे आहेत.

७. अर्जदार प्रतिवादी दि.२०.०४.२०१७ रोजी दाव्यात हजर झालेला आहे व सदर अर्ज दि.१७.०७.२०१८ रोजी दिलेला आहे. जवळपास तीन महिन्यांचा विलंब झालेला आहे. अर्जातील कारण संदिग्ध असून कागदोपत्री आधार नाही. परंतु दाव्याचे स्वरूप व झालेला विलंब विचारात घेता दावा गुणवत्तेवर कायमस्वरूपी निकाली काढणे करिता समोरील बाजूस खर्च देणेवर संधी देणे आवश्यक आहे, करिता खालील आदेश.

<u>**आदेश**</u>

अर्ज समोरील बाजूस रू.५००/—(पाचशे मात्र) खर्च देण्यावर मंजूर करण्यात येतो.

दि. ११/०७/२०१९

(श.गि.दुबाले)
दि.न्या.क.स्तर, नांदगाव.